# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government of Maharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4 Dated 27th Sept. 2011 & Presently a State University governed by Maharashtra Public University Act, 2016 (Maharashtra Act No. VI of 2017)

## Office of the Director Students' Development

**Dr. Priya Gedam**
**Director Students' Development (I/c.)**
**Ph. No. -**

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: unigug.org
Email : nssdsw.gug@ gmail.com


**पत्र क्र. No.GU/DSW / 1533 /2020** **Dt: 15 /07/2020**

प्रति,
मा. प्राचार्य / विभागप्रमुख,
संलग्नीत सर्व महाविद्यालये व विद्यापीठ पदव्युत्तर शैक्षणिक विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

विषय :– सत्र (२०२०–२०२१) मध्ये 'कमवा व शिका योजना' राबविण्यास प्रस्ताव पाठविण्याबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपनास कळविण्यात येते की, महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय शिक्षणाच्या कक्षेत उच्च शिक्षणाचा अंतर्भाव असल्याणे विद्यार्थ्यांला अध्ययन, अध्यापन व संशोधन एवढयापुरता मर्यादित न ठेवता त्याला संस्कृतीने वाढवावे, उच्च शिक्षण घेत असतांना विद्यार्थ्यांवर श्रमसंस्कार व्हावेत व त्याने हा ठेवा निरंतर जपावा या हेतुने सत्र २०१५ – २०१६ पासून कमवा व शिका योजना सुरू करण्यात आली आहे.

सत्र २०२० – २०२१ मध्ये 'कमवा व शिका योजना' राबविण्याकरीता संलग्नीत महाविद्यालये व विद्यापीठ पदव्युत्तर शैक्षणिक विभागाकडून प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. याबाबतची माहिती व नियमावली व विहित प्रस्ताव नमुना संलग्न केलेला आहे. करीता आपनास आपल्या महाविद्यालयामध्ये सदरहु योजना दिनांक ०१ ऑगस्ट २०२० ते २७ फेब्रुवारी २०२१ पर्यत राबविण्याच्या दृष्टीने दिनांक ३० सप्टेंबर २०२० पर्यत संचालक, विद्यार्थी विकास विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्या कार्यालयात प्रस्ताव सादर करावा, हि विनंती.

धन्यवाद!

(डॉ. प्रिया गेडाम)
संचालक (प्र.)
विद्यार्थी विकास विभाग
गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
## विद्यार्थी विकास विभाग
## कमवा आणि शिका योजना नियमावली

**प्रस्तावना:—**

महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय शिक्षणाच्या कक्षेत उच्च शिक्षणाचा अंतर्भाव असल्याने विद्यार्थ्याला अध्ययन, अध्यापन व संशोधन एवढयापुरते मर्यादित न ठेवता, त्याला संस्कृतीने वाढवावे हा शिक्षणाचा मुळ दृष्टीकोन आहे. उच्च शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांवर श्रम संस्काराचाही वर्षाव व्हावा, त्यांनी हा ठेवा निरंतन जपावा या उदात्त हेतूने कमवा आणि शिका योजना गोंडवाना विद्यापीठाने सुरु केलेली आहे.

**योजनेची उद्दीष्टे:—**

१. आर्थिकदृष्टया दुर्बल, गरजू आणि होतकरु विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण संपादन करण्यासाठी आर्थिक सहाय्य करणे.
२. मानवी श्रमाची प्रतिष्ठा जोपासणे.
३. स्वयं रोजगाराच्या दृष्टीने विद्यार्थ्यांना प्रवृत्त करणे.
४. ज्ञान सेवक (Knowledge Servant ) बनविणे.
५. श्रम संस्कृतीची ( Work Culture) जाणीव निर्माण करणे.
६. विविध प्रकारची कामे करुन मिळणाऱ्या अनुभवाचा लाभ विद्यार्थ्यांना या योजने अंतर्गत होवू शकेल.

**योजनेकरिता पात्रता:—**

ही योजना गोंडवाना विद्यापीठाशी संलग्रित असलेली विविध महाविद्यालये व विविध पदव्युत्तर शैक्षणिक विभागांमधुन पदवी अथवा पदव्युत्तर वर्गात उच्च शिक्षण घेणाऱ्या नियमित (Regular) विद्यार्थी/विद्यार्थिनींसाठी लागू राहील. या योजनेची अंमलबजावणी संबंधीत संलग्न महाविद्यालयामार्फत करण्यात येईल तथापी महाविद्यालयास ''कमवा आणि शिका'' योजना कार्यान्वित करण्यासाठी विद्यापीठाची मान्यता घेणे दरवर्षी अनिवार्य असेल. जी महाविद्यालये सरदहु योजनेच्या मार्गदर्शक तत्वांचा योग्य वापर करुन, योजना प्रभावीपणे राबवतील अशा महाविद्यालयांना पूढील वर्षी प्राधान्य देण्यात येईल.

**अर्ज करण्याची पद्धत:—**

१. सदर योजना महाविद्यालयात/विद्यापीठाच्या पदव्युत्तर शैक्षणिक विभागात राबविण्यास मान्यता देण्याबाबतचे अधिकार मा. संचालक विद्यार्थी विकास यांना राहतील.
२. मान्यता प्राप्त करण्यासाठी विहीत नमुन्यात 'संचालक विद्यार्थी विकास' यांचे कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. सदर प्रस्ताव मा. संचालक यांच्याकडे दि. ३० सप्टेंबर पुर्वी सादर करणे अनिवार्य आहे. त्यानंतर आलेल्या प्रस्तावांचा सदर योजना राबविण्यासाठी विचार केला जाणार नाही.
३. विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील गडचिरोली व चंद्रपूर या दोन्ही जिल्हयातील संलग्न महाविद्यालयाकडून आलेल्या प्रस्तावांची छाननी करुन नियमानुसार महाविद्यालयाची सदर योजना राबवावयाची आहे.
४. तद्नंतर महाविद्यालयाला मान्यता पत्र पाठविण्यात येईल. मान्यता प्राप्त महाविद्यालयांनीच ही योजना राबवावयाची आहे.

## 'अ' योजनेची अंमलबजावणी :—

''कमवा आणि शिका'' या योजनेच्या प्रवेशा संदर्भातील सुचना महाविद्यालयाच्या सुचनाफलकावर लावून तसेच प्रत्येक वर्गामध्ये सूचना देवून विहीत नमून्यात अर्ज सादर करण्यासाठी आवाहन करावे.

१. विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेल्या सर्व अर्जाची छाननी करणे.
२. महाविद्यालयातील सल्लागार समिती मार्फत विद्यार्थ्यांच्या निवड करणे.
३. सल्लागार समितीचा निर्णय अंतिम राहील.
४. समितीद्वारे निवड केलेल्या विद्यार्थ्यांच्या यादीची एक प्रत मा. संचालक विद्यार्थी विकास यांचेकडे पाठविणे अनिवार्य आहे.
५. महाविद्याल स्तरावर जास्तीत जास्त १० विद्यार्थी व विद्यापीठ, पदव्युत्तर शैक्षणिक विभागातील जास्तीत जास्त ४० विद्यार्थ्यांचा समावेश असावा.

## 'ब' योजने अंतर्गत करावयाची कामे:—

या योजनेमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी खालील नमूद केलेली कामे करावीत. परंतू स्थानिक परिस्थितीनुसार सल्लागार समितीच्या मान्यतेने इतरही कामांचा समावेश महाविद्यालयाची गरज लक्षात घेवून करता येईल.

(१) **कार्यालयीन कामे:—** प्रशासकीय विभाग, ग्रंथालय, प्रयोगशाळा व अन्य विभागातील कामे, इत्यादी.
(२) **तांत्रिक कामे:—** संगणकावरील कामे, झेरॉक्स मशीन, टेलिफोन बूथ चालविणे, इत्यादी.
(३) **फील्ड वर्क:—** बागेची निगा राखणे, परिसरातील झाडांची निगा राखणे, खेळांची मैदाने तयार करणे व त्याची निगा राखणे, परिसर स्वच्छता करणे, गांडुळखत प्रकल्प राबवविणे, नर्सरी युनिट तयार करणे, इत्यादी.

## 'क' कामाचे तास:—

(१) विद्यार्थ्याला आठवडयातुन चार दिवस प्रत्येकी फक्त एक (०१) तास कार्यालयीन/तात्रिक काम देता येईल.
(२) ज्या दिवशी कार्यालयात सुट्टी असेल, त्या दिवशी कार्यालयीन काम बंद असेल व हजेरी पत्रकावर विद्यार्थ्यांच्या गैरहजेरीची नोंद घेण्यात येईल.
(३) विद्यार्थ्याला फक्त एक (०१) तास फील्ड वर्क देता येईल. कार्यालयाला सुट्टी असेल त्या दिवशीही फील्ड वर्क करता येईल.

## 'ड' कामाचा दर व (मानधन) देण्याची पद्धत:—

(१) या योजनेतील काम करणाऱ्या विद्यार्थ्याला त्यांनी केलेल्या कामाचा मोबदला म्हणून कामाच्या प्रती तासाला रु. ३०/— या प्रमाणे मानधन देण्यात यावे. यामध्ये कोणताही परस्पर बदल करु नये.
(२) विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने विद्यार्थ्यांना द्यावयाच्या मानधनात कोणताही बदल/सुधारणा केल्यास महाविद्यालयांना कळविण्यात येईल.
(३) विद्यार्थ्यांनी केलेल्या कामाच्या एकुण तासाची गणना करुन त्याला देय असलेली मानधनाची एकुण रक्कम धनादेशाद्वारे विद्यार्थ्याच्या बॅक खात्यावर जमा करण्यात यावी.
(४) धनादेश दिल्यानंतर विद्यार्थ्याच्या नावासमोर हजेरी पत्रकावर धनादेश क्रमांक नमुद करावा व धनादेश मिळाल्याची विद्यार्थ्याची स्वाक्षरी घ्यावी. ही योजना राबविणाऱ्या महाविद्यालयाने या योजनेकरिता स्वतंत्र बॅक खाते उघडणे आहे व ते खाते 'प्राचार्य आणि विद्यार्थी विकास अधिकारी' यांचे संयुक्त स्वाक्षरीने चालविण्यात यावे.
(५) कमवा व शिका या योजनेचे प्राप्त प्रस्तावास मा. कुलगुरू, महोदय यांची मान्यता मिळाल्या नंतर सदरहु योजनेचे रक्कम अग्रीम स्वरूपात देण्यात येईल तथापी सदरहु योजना राबविल्या नंतर त्यांचे सनदी लेखापाल यांनी प्रमाणित केलेली उपयोगीता प्रमाणपत्र व विद्यार्थ्यांचे हजेरीपत्रकासह १० मार्च पर्यत सादर करणे आवश्यक आहे.

**'इ' हजेरी पत्रक:—**

(१) सदर योजनेमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या यादीनुसार विद्यार्थ्यांचे मासिक हजेरीपत्रक तयार करावे.

(२) हजेरीपत्रक विद्यापीठाने दिलेल्या विहीत नमुन्याप्रमाणेच असावे.

(३) हजेरीपत्रकामध्ये प्रत्येक दिवशी काम केल्याचे एकुण तास, कामाचा मोबदला कामाचे स्वरुप व स्वाक्षरी असणे अनिवार्य आहे.

(४) गैरहजर असलेल्या '**X**' चिन्ह असावे.

(५) हजेरी पत्रकावर कोठेही उपस्थिती अथवा अनुपस्थितीबाबत अनुक्रमे **P** किंवा **A** नमुद केलेले नसावे.

(६) हजेरी पत्रकाच्या खाली विद्यार्थी विकास अधिकारी व प्राचार्यांची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे.

**'फ' वार्षिक हिशेब सादर करण्याची पद्धत :—**

(१) प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या ऑगस्ट ते फेब्रुवारीच्या अखेरपर्यंत ही योजना महाविद्यालयाने राबवावी.

(२) या योजनेचे सर्व हिशेब शैक्षणिक वर्षाच्या १० मार्च पर्यंत पुर्ण करावेत. या कालमर्यादेची कृपया नोंद घ्यावी.

(३) हिशेब तपासणीच्या वेळी खालील कागदपत्रे सादर करावे.

अ) कमवा व शिका योजनेच्या चालु शैक्षणिक वर्षातील मान्यतापत्राची प्रत.

ब) कामाचा तपशिलवार वार्षिक अहवाल.

क) योजनेसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांची यादी प्राचार्याच्या स्वाक्षरीसह.

ड) विद्यार्थ्यांचे मासिक हजेरीपट.

ई) विद्यार्थ्यांची मानधन दिलेली देयके, धनादेश क्रमांकासह, महाविद्यालयाचे बॅक पासबुक

फ) खर्चाचे विनियोग प्रमाणपत्र व विवरणपत्रांवर सनदी लेखापाल, विद्यार्थी विकास अधिकारी व प्राचार्य यांची स्वाक्षरी व शिका आवश्यक आहे.

**अन्य नियम :**

(१) जे विद्यार्थी गरीब परंतु हुशार व होतकरु आहेत अशा विद्यार्थ्यांना या योजनेत प्रवेश द्यावा.

(२) सदरहु योजना फेब्रुवारी महिन्यापर्यंतच राहील व नंतर पून्हा नविन वर्षात ०१ ऑगस्ट पासुन सुरु होईल.

(३) विद्यार्थ्यांची निवड सल्लागार समिती करेल व समितीचा निर्णय बंधनकारक राहील.

(४) विद्यार्थ्यांचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रु १,००,०००/— पेक्षा जास्त नसावे.

(५) ज्या विद्यार्थ्यांना भारत सरकारची शिष्यवृत्ती किंवा तत्सम शिष्यवृत्ती राज्य शासनाकडुन मिळते अशा विद्यार्थ्यांनी प्राधान्य देण्यात येवू नये. अशा विद्यार्थ्यांना जागा रिक्त असल्यास सल्लागार समितीच्या निर्णयानुसार प्रवेश द्यावा.

(६) परीक्षा कालावधीत सदरहु योजना राबविल्या जानार नाहीत.

# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

## विद्यार्थी विकास विभाग

**महाविद्यालयीन स्तरावरील कमवा आणि शिका योजना २० —२०     साठी (प्रस्ताव)**

१. महाविद्यालयाचे नाव व पत्ता : ..............................................................................................................................................................................................................

२. महाविद्यालय स्थापनेचे वर्ष : ..........................................................................

अनुदानित/विनाअनुदानित: ..........................................................................

३. प्राचार्य नाव व: ..........................................................................

संपर्क क्र. (मोबाईल) : ..........................................................................

४. विद्यार्थी विकास अधिकारी नाव : ..........................................................................

संपर्क क्र. (मोबाईल) : ..........................................................................

५. विद्यार्थी कल्याण अधिकाऱ्यास मान्यमा घेतलेली आहे का? : होय......... नाही ...........

६. घेतलेली असल्यास कालावधी नमूद करावा : शै. वर्ष ............... ते शै. वर्ष ..........
(मान्यता पत्राची छायांकित प्रत जोडावी)

७. महाविद्यालयातील विद्यार्थी — संख्या :—

८.

| पदवी | | | पदव्युत्तर | | |
|---|---|---|---|---|---|
| मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण |
| | | | | | |
| | | | | | |

९. महाविद्यालयातील प्राध्यापकांची संख्या : ..........................................................................

१०. महाविद्यालयातील शिक्षकेत्तर सेवकांची संख्या : ..........................................................................

१०. महाविद्यालयाचा परिसर : क्षेत्रफळ : ............... इमारतींची संख्या:................ ......
प्रयोगशाळा : .......................... उद्यानाचे क्षेत्रफळ : ...........कार्यशाळा.. ...........

# सल्लागार समिती सदस्यांची नावे :

| | | |
|---|---|---|
| १. | प्राचार्य | —अध्यक्ष .................................... |
| २. | संस्था चालकांचे प्रतिनिधी | —सदस्य .................................... |
| ३. | विद्यार्थी विकास अधिकारी | —सचिव .................................... |
| ४. | प्राध्यापिका प्रतिनिधी | —सदस्य .................................... |
| ५. | रासेयो कार्यक्रम अधिकारी | —सदस्य .................................... |
| ६. | राष्ट्रीय छात्रसेना अधिकारी असल्यास | —सदस्य .................................... |
| ७. | शारीरिक शिक्षण संचालक | —सदस्य .................................... |
| ८. | विद्यार्थीनी प्रतिनिधी (विद्यार्थी परिषदेचे सचिव | —सदस्य .................................... |
| ९. | विद्यार्थी प्रतिनिधी | —सदस्य .................................... |
| १०. | महाविद्यालयीन शिक्षकेत्तर कर्मचारी | —सदस्य .................................... |
| ११. | स्थानिक समाजसेवक | —सदस्य .................................... |

१२. सन २० —२० या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयातर्फे कोणते उपक्रम सदर योजनेअंतर्गत राबविता येतील, या संबंधीच्या आराखडा : ........................................
..............................................................................................................
..............................................................................................................
..............................................................................................................
..............................................................................................................
......................................................

(टीप — विद्यार्थी विकास अधिकारी यांची मान्यता घेतलेली नसल्यास मा.प्राचार्यांनी / मा. संचालकांनी याबाबत स्वतंत्रपणे पत्र पाठवून ३ वर्षाकरिता मान्यता घेणे आवश्यक आहे.)

| | | |
|---|---|---|
| विद्यार्थी विकास अधिकारी (D.S.D.)<br>स्वाक्षरी व शिक्का | महाविद्यालयाचा<br>शिक्का | प्राचार्य<br>स्वाक्षरी व शिक्का |